# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक क्र.३४७/२०२०

**गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत ऑनलाईन पद्धतीने हिशेब सादर करण्याबाबत...**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत महाविद्यालय/परिसंस्थेने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन विद्यापीठ अधिकार मंडळाने महाविद्यालयास/परिसंस्थेस चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा आयोजन तसेच उपकरणे, क्रीडा साहित्य, बांधकाम/सौर ऊर्जा उपकरणे खरेदी याकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे.

अर्थसहाय्य मंजूर केलेल्या प्रस्तावासाठी केंद्रीय पध्दतीने खालीलप्रमाणे हिशेब स्वीकारण्यासाठी शिबिरांचे नियोजन करण्यात आले होते. अनुक्रमे नाशिक, अहमदनगर, पुणे शहर, पुणे जिल्हा ग्रामीण दि. २२, २३ व २६, २७ मार्च २०२० रोजी आयोजित करण्यात आले होते.

कोरोना विषाणूचा संसर्ग झपाटयाने वाढत असल्यामुळे विद्यापीठातील सर्वच घटकांनी प्रतिबंधात्मक दक्षता घेणे आवश्यक असल्याने नियोजित केलेले केंद्रिय हिशेब तपासणी शिबीर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत केंद्रीय पध्दतीने हिशेब तपासणी शिबिर रद्द केल्याचे परिपत्रक दि. १८ मार्च २०२० रोजी जारी करण्यात आलेले असून हिशेब कशा पध्दतीने सादर करावयाचे याबाबत स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल असे महाविद्यालय/परिसंस्था यांना कळविण्यात आले आहे.

ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणाऱ्या हिशेबांसाठी गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत असलेल्या मार्गदर्शक तत्त्वातील नमूद केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.

यांस अनुसरून गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत मंजूर केलेल्या अर्थसहाय्याचे हिशेब विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील University Home Page_>BOD_>BOD Online_>Login_>For College Users_>After College Login to Main Menu_>Click Planning and Development_>Click Menu_> Click Fill Expenditure या लिंकवर जाऊन मॅन्युअलनुसार माहिती भरुन लेखा परिक्षकांनी परिक्षण केलेली देयके व प्रमाणपत्रे दि. ३१/१२/२०२० अखेर अपलोड करावीत.

सौर ऊर्जा उपकरणे खरेदीतंर्गत सन २०१६-१७ ते २०१९-२० मध्ये ज्या महाविद्यालयास/परिसंस्थेस ५० टक्के उचल रक्कम अदा करण्यात आलेली आहे अशा महाविद्यालय/परिसंस्थेने सुद्धा अंतिम अर्थसहाय्य करता ऑनलाईन पद्धतीने माहिती भरावयाची आहे.

सादर करण्यात येणाऱ्या हिशेबांचे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर महाविद्यालयांची/परिसंस्थांची बँक विषयक माहिती अद्ययावत असेल अशाच महाविद्यालयांची/परिसंस्थांना रक्कम NEFT द्वारे नोंद केलेल्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येणार आहे.

तसेच ज्या महाविद्यालयांची/परिसंस्थांची विद्यापीठाच्या संकेतस्थळावर बँक विषयक माहिती अद्ययावत केलेली नाही. अशा महाविद्यालय/परिसंस्थांनी खालील लिंकवर जाऊन University Home Page_>BOD_>BOD Online_>Login_>For College Users_>After College Login to Main Menu_>Click College Details_>Click Finance Bank Details माहिती अपलोड करण्यात यावी व पुढील billunit@unipune.ac.in या ई-मेलवर महाविद्यालयाचे नाव व College PUN Code कळविण्यात यावा, त्यानुसार बँक खात्यावर रक्कम वर्ग करण्यात येईल.

गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत हिशेबाची माहिती भरत असताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी आयटी सेलच्या ईमेल collegesupport@pun.unipune.ac.in किंवा दूरध्वनी क्रमांक ०२०-७१५३३६३३ वर संपर्क साधून माहिती घेण्यात यावी.

आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये मंजूर झालेले अर्थसहाय्याचे हिशेब दि. ३१/१२/२०२० अखेर पर्यंतच ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील. त्यानंतर विद्यापीठामार्फत कोणतेही हिशेब स्विकारले जाणार नाहीत व कोणत्याही प्रकारे अर्थसहाय्य अदा केले जाणार नाही.

सदर कालावधीत महाविद्यालय/परिसंस्थांकडून विद्यापीठास हिशेब सादर न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेची राहील.

हिशेबाची संबंधित मूळ कागदपत्रे महाविद्यालय/परिसंस्था यांनी पुढील १० वर्ष जतन करावी लागेल. विद्यापीठास ज्या ज्यावेळेस आवश्यकता असेल त्यावेळी महाविद्यालय/ परिसंस्थांनी हि कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आनिवार्य राहिल. माहितीच्या अधिकारतंर्गत महाविद्यालये/परिसंस्थांची या हिशेबासंदर्भात माहिती मागविल्यास ती संबंधित कागदपत्रे संबंधित महाविद्यालय/परिसंस्था यांनी त्यांच्या स्तरावर संबंधितांना परस्पर उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहिल.

महाविद्यालय/परिसंस्थांना अदा करण्यात आलेल्या एकूण हिशेबापैकी काही हिशेब/खरेदी केलेल्या वस्तुची यादृच्छिक (Random) पध्दतीने संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांमध्ये समक्ष जाऊन तपासणी/खरेदी करण्यात आलेल्या वस्तूची पाहणी करण्यात येईल.

विद्यापीठाच्या ऑनलाईन प्रणालीमध्ये सादर करण्यात आलेल्या हिशेबांच्या विनियोग प्रमाणपत्र, खर्चाच्या विवरणपत्राशी संबंधित विवरणपत्रातील माहिती यांची ज्यावेळेस प्रत्यक्ष मूळ कागदपत्रांची तपासणी/खरेदी करण्यात आलेल्या वस्तूची पाहणी करण्यात येईल. यामध्ये विद्यापीठाकडे सादर करण्यात आलेल्या हिशेबांच्या संबंधित कागदपत्रे व विवरणपत्रामधील दर्शविलेल्या देयकांमध्ये व प्रत्यक्ष पाहणीच्या देयकामध्ये/खरेदी वस्तूमध्ये त्रृटी/तफावत आढळून आल्यास संबंधित महाविद्यालये/परिसंस्थे विरुध्द दंडात्मक किंवा ३ वर्षासाठी कोणतेही अनुदान मंजूर करण्यात येणार नाही अथवा दोन्हीही कार्यवाही करण्याचे अधिकार मा.कुलगुरू यांना राहतील, याची कृपया नोंद द्यावी.

16/12/2020

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०२०-२१/१०५९
दिनांक : १६ डिसेंबर, २०२०

**सीए अतुल पाटणकर**
**वित्त व लेखा अधिकारी**

**प्रत :- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.